दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ९६ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.३१ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# एफडीसीएम कडून राज्य शासनाला मिळणार ५ कोटी ८२ लक्ष रुपयांचा लाभांश

## महामंडळाच्या स्थापनेपासून मिळालेली आजपर्यंतची सर्वात मोठी रक्कम

## वनविभाग सतत अग्रेसर असल्याचे समाधान : ना. सुधीर मुनगंटीवार



**चंद्रपूर : महाराष्ट्र वनविकास महामंडळाकडून राज्य शासनाला यावर्षी सन २०२२-२०२३ या वर्षासाठी ५ कोटी ८२ लक्ष रुपयांचा लाभांश मिळणे प्रस्तावित असून महामंडळाची स्थापना झाल्यापासून शासनाला प्राप्त होणारा हा सर्वाधिक मोठा लाभांश आहे. २८ डिसेंबर रोजी नियोजन भवन येथे वन, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या महामंडळाच्या संचालक मंडळाच्या (बोर्ड) मिटिंग मध्ये ही माहिती मिळताच ना. मुनगंटीवार यांनी सर्वांचे अभिनंदन केले**

विशेष म्हणजे महामंडळाची स्थापना झाल्यापासून राज्य शासनाला मिळणारा हा सर्वाधिक मोठा लाभांश आहे.एफडीसीएम च्या अहवालबाबत सीएजी ने देखील नील चा शेरा देऊन अहवालच्या पारदर्शी असल्याबाबत शिक्कामोर्तब केले आहे. हिदेखील मोठी उपलब्धी आहे.यासंदर्भात बोलताना ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, राज्य शासनाला वनविकास महामंडळाच्या माध्यमातून आर्थिक फायदा होत असल्याचा मनापासून आनंद होत आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून काम करणाऱ्या मोजक्याच महामंडळाकडून आर्थिक लाभ शासनाला मिळतो त्यात वानविभाग कुठेही मागे नाही, तर सतत अग्रेसर असल्याचे अत्यंत समाधान होत आहे. वनक्षेत्र विकास, बांबू लागवडीला प्रोत्साहन, विक्रमी वृक्ष लागवड, उत्तम दर्जाचे सागवान लावून योग्य विपणन व्यवस्था यांसह प्रत्येक बाबतीत वन विकास महामंडळाचे नियोजन उल्लेखनीय आहे. अयोध्या येथे प्रभू श्रीराम मंदिरासाठी गेलेले काष्ठ, संसदेच्या नवीन इमारतीत सेंट्रल व्हिस्टा साठी गेले काष्ठ महाराष्ट्राच्या वन क्षेत्रातून गेले याचे मला विशेष समाधान आहे असेही ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले. एफडीसीएम चे व्यवस्थापकीय संचालक विकास गुप्ता, वनबल प्रमुख शैलेश टेम्भूर्णीकर आणि त्यांच्या टीम चे यावेळी ना. सुधीर मुनगंटीवार यांनी अभिनंदन केले.वन संरक्षण आणि वन्यजीव संवर्धनासाठी ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या कुशल नेतृत्वात वनविभाग झपाट्याने प्रगती करीत आहे. नवनवीन संकल्पना राबवून वनक्षेत्र वाढीसाठी तसेच वनांच्या माध्यमातून पर्यटनाला चालना देण्याचे काम गतीने सुरू आहे. एमआयडीसी च्या धर्तीवर एफआयडीसी ची निर्मिती करून फार्निचर व इतर साहित्याकरिता मोठे दालन उभे करण्याचा त्यांचा मानस आहे. यामुळे उद्योगाला आणि रोजगाराला चालना मिळणार आहे.वनविकास महामंडळाकडून गेल्या दहा वर्षात शासनाला मिळालेल्या लाभांशाचा आढावा घेतल्यास तो सन २०१४-२०१५ मध्ये ४५.४२ लक्ष रुपयांपासून २०२२-२०२३ मध्ये ५८२.०० लक्ष रुपये असा प्रगतीचा आलेख अधोरेखित होतो.

## नवभारत विद्यालय मुल येथे वार्षिक स्नेह संमेलन उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न

**मूल । प्रतिनिधी**



नवभारत विद्यालय,कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय तथा एम.सी.वी.सी महाविद्यालय मुल यांच्या सौजन्याने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन 'बहर' पार पडले. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिक्षण प्रसारक मंडळ मुल चे अध्यक्ष ड. बाबासाहेब वासाडे होते.उद्घाटक म्हणून शिक्षण प्रसारक मंडळ मुल चे सचिव ड. अनिलराव वैरागडे, प्रमुख अतिथी म्हणून डॉ.राममोहन बोकारे मंडळाचे सदस्य,शशिकांत धर्माधिकारी मंडळाचे सहसचिव, अशोकराव झाडे प्राचार्य,अल्का राजमलवार मुख्याध्यापिका कन्या विद्यालय हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय वि तु नागपुरे आणि क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन तथा द्वीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर अशोक येरमे यांच्या कलानिकेतन मंच ने स्वागत गीताने पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य अशोकराव झाडे यांनी केले.त्यांनी वर्षभरातील विविध उपक्रमाबद्दल माहिती देऊन अहवाल सादर केला. त्यानंतर मान्यवर मंडळीच्या हस्ते जिल्हास्तरावर,राज्यस्तरावर निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष ड बाबासाहेब वासाडे यांनी विद्यार्थ्यांना चैतन्यशील व्यक्तिमत्त्व देण्यासाठी सर्वांगीण विकास आवश्यक असतो असे प्रतिपादन केले. संस्थेचे सचिव ड. अनिलराव वैरागडे यांनी आपल्या उद्घाटनीय भाषणात विद्यार्थ्यांचा शारीरिक,मानसिक,बौद्धिक, सामाजिक विकास म्हणजे सर्वांगीण विकास होय असे सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन निलेश माथनकर आणि प्रतिमा उमक यांनी केले तर आभारप्रदर्शन माधुरी तलांडे यांनी मानले.

## आर.के.हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शनीत प्रथम

**पुलगाव । प्रतिनिधी**



स्थानिय रंगलाल केजडीवाल हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयाचा हिंगणघाट येथे आयोजित जिल्हा स्तरीय विज्ञान परदर्शनी मध्ये ९ ते १२ या गटात पाहिला क्रमांक प्राप्त झाला आहे.

सेंद्रिय संकल्पनेवर बनविलेल्या या मॉडेल चे नाव विघटन पात्र असे आहे.कोणत्याही रोपवाटिकेमधून जेंव्हा आपण एखाद फुल झाड आणतो. त्यावेळी त्या झाडाच्या मुळाशी प्लास्टिक पिशवी लावलेली असते.या ठिकाणी प्लास्टिक पिशवीच्या ऐवजी विघटन पात्र घेऊन त्यात रोप लावल्यास ते पुढे जमिनीमध्ये एकरूप होऊन जाईल. ही या मॉडेलची संकल्पना आहे.भारता सारख्या देशामध्ये पर्यावरण प्रदूषण मुक्त करण्याकरिता हे अतिशय उपयुक्त मॉडेल असल्यामुळे प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे.हे मॉडेल तयार करण्यासाठी दीपेश करवडे,ओशन पाटील,चाहत विश्वकर्मा व तेजस धवराल या विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत घेतली आहे तर या मॉडेल ला उत्कृष्ठ मार्गदर्शन प्रा.अजय कोयाळ,प्रा.गौरव दुधबावरे व प्रा.अजय धोटे यांचे लाभले आहे.जिल्हातून प्रथम क्रमांक प्राप्त झाल्याबद्दल आर.के.हायस्कुल ट्रस्ट चे अध्यक्ष हरिप्रकाश केजरीवाल, आर.के.शाळा समितीचे अध्यक्ष रंजनकुमार केजरीवाल,ज्येष्ठ विश्वस्त द्वारकादास दरक,मुख्य समन्वयक नूरसिंग जाधव,संस्थेचे प्राचार्य संजय सहारे,ज्युनियर कॉलेज चे उपप्राचार्य प्रा.सुनिल भोयर,उपमुख्याध्यापिका माया वंडलकर, आर.के.ज्ञान मंदिरम च्या मुख्याध्यापिका राजश्री ओक,पर्यवेक्षक गणेश झंगळे,लालबहादूर यादव सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## गांधी सिटी पब्लिक स्कुल मध्ये क्रिडा महोत्सव



**पुलगाव । प्रतिनिधी**

जय महाकाली शिक्षण संस्था द्वारा संचालित गांधी सिटी पब्लिक स्कूल नाचणगांव पुलगांव येथे तीन दिवसीय क्रीडा महोत्सवाचे चे आयोजन दिनांक २८ डिसेंबर ते ३० डिसेंबरपर्यंत करण्यात आले .

कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे मुख्याध्यापक धनंजय शिंगणजुडे यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलीत करून करण्यात आली. ध्वज मार्च करून विद्यार्थ्यांनी आप आपल्या हाऊसचे प्रदर्शन करून क्रीडा महोत्सवाची सुरुवात केली. शाळेचे मुख्याध्यापक धनंजय शिंगणजुडे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना मैदानी खेळाचे महत्व समजावून सांगितले .या क्रीडा महोत्सवात नर्सरी पासून दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला .या क्रीडा उत्सवात राधाकृष्णन हाऊस, विवेकानंद हाऊस, पटेल हाऊस, टॅगोर हाऊस यांनी खो-खो,क्रिकेट, कबड्डी,लंगडी, रस्सीखेच,१०० मीटर दौड ,फुटबॉल, बॉल रेस इत्यादी खेळामध्ये उत्कृष्ट प्रदर्शन विद्यार्थ्यांकडून करण्यात आले. पुस्तकांपासून दूर राहून विद्यार्थ्यांनी आनंद पूर्वक आणि शिस्तीत राहून खेळामध्ये आपला सहभाग दर्शवला. क्रीडा स्पर्धा शाळेच्या चार हाऊस मध्ये घेण्यात आली .ज्यामध्ये सर्वांनी आपला उत्कृष्ट सहभाग दर्शवला. मुख्याध्यापकांनी कार्यक्रम यशस्वी बनवल्या बद्दल शाळेचे क्रीडा शिक्षक विशाल आणि स्मिता याचे अभिनंदन केले . कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थी स्नेहा गवारले आणि अरहान शेख यांनी केले.

## आयुष्मान भारत मिशनचा लाभ जिल्ह्यातील शेवटच्या घटकापर्यंत मिळावा-डॉ.ओमप्रकाश शेटे

**बीड । प्रतिनिधी**



जिल्ह्यातील सर्व वयोगटातील नागरीकांना आयुष्यामन भारत मिशन अंतर्गत योजनेचा लाभ मिळावा यासाठी शासन स्तरावर प्रयन व्हावेत, असे आवाहन आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालय येथे डॉ. शेटे यांच्या अध्यक्षतेत आयुष्मान भारत/ महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेची बैठक झाली. यावेळी जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा रुग्णालय, शासकीय रुग्णालय, खाजगी रुग्णालयांचे प्रमुख याबैठकीस उपस्थित होते.केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ जिल्ह्यातील नागरीकांना मिळावा याकरीता विकसित भारत संकल्प यात्रा २०२४ अंतर्गत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संबंधित योजनांची आढावा बैठक डॉ. शेटे यांनी घेतली. यावेळी डॉ.शेटे यांनी जिल्हयातील सध्या स्थितीची माहिती जाणून घेतली. यामध्ये आयुष्यमान भारत अंतर्गत देण्यात येणारे ओळखपत्र अधिकाधिक लोकांना मिळावे, यासाठी विविध स्तरावर प्रयत्नं करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या, यातंर्गत विशेष शिबिरांचे आयोजन करून नागरीकांना या योजनेचा लाभ मिळावा, यासाठी प्रवृत्त करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. डॉ. शेटे या जिल्हयाचे भुमिपुत्र असल्यामुळे जिल्ह्यातील जनआरोग्य सेवा अधिक सुदृढ व्हावी यासाठीचीभावना असल्याचे ते यावेळी म्हणाले. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत शासनाच्या यादीवर असणाऱ्या ठराविक खाजगी रुग्णालयात रुग्णांवर इलाज केला जातो. मात्र, शासन यादीवरील रुग्णालयाला ठरवून दिलेले दर हे मागील १०-१२ वर्ष जुने असून हे वाढविण्यात यावे, अशी विनंती खाजगी रुग्णालयाच्या उपस्थित्त प्रतिनिधींनी केली. यावर याबाबत सर्वंकष विचार केला जाईल असे आश्वासन देऊन याबाबत एक समिती नेमली जाईल, यामध्ये शासकीय, निमशासकीय, खाजगी रुग्णालयातील वैद्यकीय विभागाचे प्रमुख नेमून अंतिम दर ठरविण्यात येतील, असे डॉ.शेटे यांनी सांगीतले. यासह महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत अधिक आजाराचा समावेश करून रुग्णांना दिलासा देण्याचा प्रयत्न असल्याचेही डॉ. शेटे यांनी यावेळी माहिती दिली. जिल्हयातील आरोग्य सेवेसाठी आवश्यक असणाऱ्या शासकीय पायाभूत सुविधांच्या बाबत आजच्या बैठकीत चर्चा झाली. वर्ष २०२३-२४ आणि २०२४-२५ या वर्षासाठी पायाभूत सुविधांकरीता आराखडा निश्चित केला आहे. यासाठी शासनाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या मंजूरी लवकरात लवकर मिळविण्यासाठी प्रयत्न केले जातील असे डॉ. शेटे याप्रसंगी म्हणाले.

# संपादकीय


## प्रसंग आणि पेच

लोकांची मने जिंकणे ही बाब अत्यंत महत्त्वाची; परंतु ती जबाबदारी प्रामुख्याने राजकीय नेतृत्वाने पेलायची असते, याचा विसर पडू नये.

परचक्रापासून देशाचे संरक्षण करणे, देशाच्या सीमा सुरक्षित ठेवणे, हे लष्कराचे मुख्य काम असते; तर देशांतर्गत कायदा-सुव्यवस्था स्थिती सांभाळणे हे पोलिसांचे. मात्र अपवादात्मक परिस्थितीत देशाच्या अंतर्गत भागातील समस्या हाताळण्यासाठीही लष्कराला पाचारण करावे लागते. आपल्याकडे हे आता अपवादात्मक राहिलेले नाही, ही बाब मान्य करावी लागेल.ईशान्येकडील राज्यांतील अशांत भागात; तसेच नक्षलग्रस्त भागांत लष्कराची पुन्हापुन्हा मदत घ्यावी लागते. १९९० नंतर काश्मीरमध्ये दहशतवादाचे थैमान सुरू झाले, त्यानंतर तेथे लष्कर तैनात करण्यात आले असून, प्रदीर्घ काळ ते तेथे आहे. फुटिरतावादाची चळवळ आणि उत्तरोत्तर त्याला मिळत असलेले दहशतवादाचे परिमाण यामुळे तसे करणे अपरिहार्यही ठरले.अशा रीतीने नागरी भागात घुसखोरीच्या विरोधात कारवाईसाठी उतरलेल्या लष्करापुढचे आव्हान दुहेरी असते. घुसखोर, दहशतवाद्यांचा मुकाबला करत असताना सर्वसामान्य नागरिकांना त्रास होणार नाही, हेही पाहावे लागते. दुर्दैवाने काश्मीरमध्ये अलीकडे घडलेल्या काही घटनांमध्ये ही काळजी घेतली गेली नाही, असे दिसते. पूँच-राजौरी क्षेत्रात २१ डिसेंबर रोजी लष्करी वाहनांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात चार जवान धारातीर्थी पडले.त्यानंतर झालेल्या धरपकडीत जे नागरिक लष्करी तुकडीच्या ताब्यात होते, त्यांच्यावर अतोनात अत्याचार झाल्याचा आरोप आहे. त्या पार्श्वभूमीवर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पूँच व राजौरी भागाला भेट देऊन जवानांशी संवाद साधताना, 'दहशतवाद निर्मूलन जेवढे महत्त्वाचे, तेवढेच लोकांची मने जिंकणे आवश्यक आहे,' असे निःसंदिग्धपणे सांगितले. अनेक अर्थांनी त्यांचे हे वक्तव्य महत्त्वाचे आहे.लष्कराविषयी काही तक्रार किंवा आरोप झाले, की तो प्रश्न देशभक्तीच्या विषयाशी जोडला जातो आणि परिणामतः पीडितांच्या वेदनेकडे दुर्लक्ष होते. संरक्षणमंत्र्यांचे यावेळचे निवेदन हे त्याला अपवाद ठरते. त्यांनी एकीकडे लोकांची मने जिंकण्याचे केलेले आवाहन आणि दुसरीकडे 'प्रमाणित कार्यपद्धतीचा अवलंब' (एसओपी) केला पाहिजे, याविषयी धरलेला आग्रह पाहता या प्रसंगात काही गोष्टी अनिष्ट घडल्याची ही अप्रत्यक्ष कबुली म्हणावी लागेल.आता याचा कसोशीने पाठपुरावा करून चौकशी पूर्ण करणे आणि दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करणे, याबाबतही कुचराई होता कामा नये. मानवी हक्कांचा आदर यादृष्टीने तर हे महत्त्वाचे आहेच; पण लष्कराच्या जवानांकडून नागरिकांवर अत्याचार घडले तर या घटना काश्मिरातील स्थैर्य, शांततेला सुरूंग लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या शक्तींच्या पथ्यावर पडू शकतात. त्या शक्तींना पाकिस्तानची फूस आहे, हे जगजाहीर आहे.काश्मिरी सर्वसामान्य नागरिक भारतात सुखी नाही, असा प्रचार करण्याची एकही संधी पाकिस्तान सोडत नाही. या अपप्रचाराला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष बळ मिळेल, असे काहीही करता कामा नये. त्या पार्श्वभूमीवर राजनाथ सिंह यांनी काही गोष्टी स्पष्टपणे सांगितल्याचे स्वागत करतानाच त्यातून उपस्थित होणाऱ्या काही प्रश्नांची चर्चा आवश्यक आहे.लोकांची मने जिंकणे महत्त्वाचे, ही बाब काश्मीरच्या संदर्भात अनेक तज्ज्ञ, अभ्यासक सातत्याने सांगत आहेत. त्यामुळे हा मुद्दा महत्त्वाचा आहे, यात शंकाच नाही. परंतु ती अपेक्षा लष्कराकडून करतानाच राजकीय नेतृत्वाच्या जबाबदारीचे काय? लोकांना विश्वासात घेण्याचे, त्यांचे प्रश्न जाणून घेण्याचे काम हे प्रामुख्याने राजकीय पक्ष, नेते, कार्यकर्ते यांचे असते.या खोऱ्यातील राजकीय प्रक्रियाच सध्या खंडित झालेली आहे. काश्मीरबाबतचे राज्यघटनेतील ३७० वे कलम रद्द केल्यानंतर त्याविरोधात दाखल झालेल्या याचिकांवर निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने काश्मिरात लवकरात लवकर निवडणुका घ्यावात, असेही सांगितले आहे. केंद्र सरकार याबाबतीत काय पुढाकार घेणार, हे जास्त महत्त्वाचे ठरेल.लष्कराने काटेकोरपणे प्रमाणित कार्यपद्धती राबवावी, त्यापेक्षा वेगळे वर्तन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, ही भूमिका बरोबर आहे; परंतु लोकांची मने जिंकण्याचे काम प्रामुख्याने राजकीय वर्गाचे आहे, याची या निमित्ताने आठवण करून द्यायला हवी.भारतीय लष्कर हे आपल्या व्यावसायिक कार्य-कुशलतेसाठी ख्यातकीर्त आहे. लोकशाही देशात लष्कर हे संपूर्ण राजकीय प्रक्रियेपासून कमालीचे अलिप्त असते आणि हे सुदृढ लोकशाहीचे एक महत्त्वाचे लक्षणही मानले जाते. भारतातील परिस्थिती त्याबाबतीत किती चांगली आहे, हे समजून घ्यायचे असेल तर शेजारी देशांच्या स्थितीवर एक नजर टाकली तरी पुरे.विशेषतः पाकिस्तानात ज्या पद्धतीने लष्कराची मगरमिठी तेथील साऱ्या व्यवस्थेवर पडली आहे, ते पाहता आपल्या लष्कराचे अलिप्त राहण्याचे वैशिष्ट्य प्रकर्षाने जाणवते. या लष्कराला केवळ परचक्रच नव्हे तर दहशतवादाच्या विषवल्लीशीही मुकाबला करावा लागतो आहे. त्यामुळे बाह्य संकट आणि अंतर्गत संकट यातील रेषा धूसर झाली, हेदेखील खरे आहे.हे करताना अनेक नव्या आव्हानांना सामोरे जावे लागते आणि अनेकदा संयमाची कसोटी पाहणारे प्रसंगही येतात. या नव्या आव्हानांना सामोरे जाण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणादी सुविधांचाही आता वेगळ्या पद्धतीने विचार करावा लागेल. देशाची एकात्मता, अखंडता टिकविण्यासाठी लष्कर सज्ज आहेच, परंतु ही जबाबदारी केवळ लष्कराची नव्हे तर राजकीय वर्गाची, समाजाचीही आहे, याकडे दुर्लक्ष होऊ नये.

# परकी गुंतवणुकीचे 'थेट' लाभ

भारतीय अर्थव्यस्थेच्या वाढीसाठी 'एफडीआय' महत्त्वाचा चालक घटक आहे. २०१०-२०२० दशकात आपल्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यात 'एफडीआय'ने निःसंशयपणे मोलाची भूमिका बजावली आहे. कोविडने भारतासारख्या अनेक विकसनशील देशांमध्ये 'एफडीआय'च्या अनुषंगाने बदल घडवले आहेत.आंतरराष्ट्रीय कंपन्यांद्वारे (खत्र) होणाऱ्या गुंतवणुकीचे स्थलांतर आजकाल विकसित देशांकडून विकसनशील देशांकडे का होत आहे, याची कारणे शोधण्यावर सध्या अभ्यासकांचा भर दिसतो. आंतरराष्ट्रीय कंपन्यांना विकसनशील देशांमध्ये आपल्या स्वतःच्या अंतर्गत बाजारपेठा विकसित करण्यात स्वारस्य असते. त्यात त्यांचा खर्च वाचतो. विविध देशांमध्ये आर्थिक वाढ आणि विकासाला चालना देण्यासाठी थेट परकी गुंतवणूक (एफडीआय) महत्त्वपूर्ण असते.परकी भांडवल आणि कौशल्य आकर्षित करून, 'एफडीआय' विकसनशील देशांमध्ये वाढीव गुंतवणूक, रोजगारनिर्मिती व तांत्रिक प्रगतीमध्ये योगदान देते. यामुळे प्रगत तंत्रज्ञान आणि सर्वोत्तम कार्यपद्धतींचे हस्तांतर सुलभ होते. देशांतर्गत उद्योगांमध्ये नवकल्पना आणि उत्पादकता वाढीस चालना मिळते.भारतीय अर्थव्यवस्थेने कोविड महासाथीनंतर लक्षणीय वाढ नोंदवली आहे. २०२३-२४ या वर्षामध्ये ती जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर आहे. अनेक अर्थशास्त्रज्ञांनी असे मत मांडले आहे, की भारतीय अर्थव्यस्थेच्या वाढीसाठी 'एफडीआय' महत्त्वाचा चालक घटक आहे. २०१०-२०२० दशकात आपल्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यात 'एफडीआय'ने निःसंशयपणे मोलाची भूमिका बजावली आहे.कोविडने भारतासारख्या अनेक विकसनशील देशांमध्ये 'एफडीआय'च्या अनुषंगाने आमूलाग्र बदल घडवले आहेत. त्यामुळे दोन महत्त्वाच्या प्रश्नांवर अधिक विचार गरजेचा आहे. ते म्हणजे (१) कोविडनंतर आपल्या उत्पादनक्षेत्राला व अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी 'एफडीआय'ची नेमकी किती मदत झाली? (२) अत्यावश्यक उत्पादन उद्योगांसाठी 'एफडीआय' वाटपाच्या प्राधान्यामध्ये अलीकडे काही बदल झाले आहेत का?भारतात वर्ष २००० मध्ये चार अब्ज डॉलर असलेली 'एफडीआय' वाढून २०२२मध्ये ४९ अब्ज डॉलरवर पोचली. २०२१मध्ये ४४.८ अब्ज डॉलर असलेला 'एफडीआय'चा प्रवाह दहा टक्क्याने वाढून २०२२मध्ये ४९.३ अब्ज डॉलर झाला. वर्ष २०००मध्ये जागतिक 'एफडीआय' गुंतवणुकीपैकी केवळ ०.३% भारतात आली, २०२२मध्ये हे प्रमाण ३.८टक्क्यांवर पोचले. तथापि, अलीकडील उपलब्ध माहितीतून 'एफडीआय'च्या प्रवाहाविषयी काही प्रमुख चिंता निर्माण केल्या आहेत.भारतातील 'एफडीआय'चा ओघ २०२२-२३च्या पहिल्या सहामाहीच्या तुलनेत यंदा २४टक्क्याने घसरला आहे. २०२३-२४च्या पहिल्या सहामाहीत २०.५ अब्ज डॉलरवर आला आहे. (स्रोत: उद्योग व अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग) गेल्या सहा महिन्यांत झालेल्या 'एफडीआय'च्या सततच्या घसरणीबाबत धोरणकर्ते स्पष्टपणे कारणे देऊ शकलेले नाहीत.वर्ष २००० मध्ये ४१अब्ज डॉलर असलेला चीनमधील 'एफडीआय' गुंतवणुकीचा ओघ २०२२मध्ये वाढून १८९ अब्ज डॉलरवर पोचला; २०२२मध्ये जागतिक 'एफडीआय'मधील १४.६% वाटा चीनकडे गेला. भारतात 'एफडीआय' गुंतवणुकीचा ओघ प्रामुख्याने २००५पासून वाढला; जो २००८मध्ये उच्चांकी पातळीवर पोचला.पुढे आर्थिक संकटामुळे २०१२पर्यंत मात्र तो कमी होत गेलेला दिसतो. भारत सरकारने २०१२मध्ये 'एफडीआय'चा ओघ वाढवण्यासाठी प्रचंड प्रयत्न केला; परिणामी, २०१९ पर्यंत तो लक्षणीय वाढला. तथापि, त्यात सातत्य राहिले नाही, २०२३ मध्ये तो पुन्हा घसरला.चीनमध्ये मात्र १९९१पासून 'एफडीआय'मध्ये सातत्याने वाढच दिसते. विकसनशील देशांमधील 'एफडीआय' प्रवाहातील




लक्षणीय वाढ ही आर्थिक वाढीतील असमतोल कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. कोविडमुळे आपल्याला दोन महत्त्वाच्या समस्यांना तोंड द्यावे लागले: अलीकडच्या वर्षांत भारताकडे येणारा जगभरातील 'एफडीआय' प्रवाहाचा घसरलेला वाटा व अधिक उत्पादक (उत्पादन) क्षेत्रांमधून कमी प्रभावी (सेवा) क्षेत्रांकडे झालेले 'एफडीआय'चे वाटप.

### क्षेत्रनिहाय 'एफडीआय'चे योगदान

वर्ष २०२३-२४च्या पहिल्या सहामाहीत मुख्यतः सेवा क्षेत्रांसाठी वाटप वाढले आहे. अत्यावश्यक उत्पादन क्षेत्रांसाठी नाही. एकूण 'एफडीआय' समानतेच्या प्रवाहात उत्पादन क्षेत्रातील वाटपातील अलीकडेच नोंदवलेल्या घसरणीशी संबंधित एक चिंतेचा विषय आहे, जो २०२१-२२ या आर्थिक वर्षातील १६.३ टक्क्यांवरून २०२२-२३ आर्थिक वर्षात ९.५ टक्क्यांवर घसरला. उत्पादन क्षेत्रे कमी झाल्यास आपली आर्थिक वाढ आणखी सुधारणे ही चिंतेची बाब असेल.२०२२-२३च्या तुलनेत २०२३-२४च्या पहिल्या सहामाहीतील सर्वोच्च प्राप्तकर्ता क्षेत्राचे आमचे विश्लेषण असे दर्शविते, की संगणक सॉफ्टवेअर आणि हार्डवेअरसाठी 'एफडीआय' वाटप ८.७ टक्क्यांनी लक्षणीयरीत्या घटले आहे. त्याखालोखाल व्यापार ५.९% घट, औषधे आणि औषधनिर्मिती ३.९% घट आणि रसायने दोन टक्क्यांनी घटल्याचे आढळते. तथापि, बांधकाम क्रियाकलापांसाठी 'एफडीआय'चा प्रवाह लक्षणीयरीत्या, आठ टक्क्याने आणि धातू उद्योगात ०.४% वाढला आहे. वरील अत्यावश्यक क्षेत्रांसाठी 'एफडीआय'मध्ये झालेली घसरण योग्य नाही.भारतासारख्या देशाला भांडवल अनुपलब्धतेमुळे उत्पादनक्षेत्राला चालना देण्यासाठी संघर्षरत राहावे करावा लागत आहे. एकूणच आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी 'एफडीआय'चे संपूर्ण अर्थव्यवस्थेत योग्यरीत्या वितरण होईल, याची दक्षता महत्त्वाची आहे. जगभरातील साथीच्या आजारातून सावरण्याच्या भारताच्या क्षमतेमुळे ते गुंतवणुकीचे महत्त्वाचे ठिकाण ठरले आहे.व्यापारातील खुलेपणा, आर्थिक तंदुरुस्ती आणि इतर निर्देशकांबाबतचे अलीकडील चित्र यावरून असे दिसते, की भारताविषयी गुंतवणूकदारांना विशेष आकर्षण आहे. देशाचा मानव विकास निर्देशांक (कञख) वर्ष २०००मधील ०.५३वरून २०२३मध्ये ०.६३पर्यंत वाढला. 'एफडीआय'मधील वाढ यासाठी कारक म्हणता येऊ शकते. भारतातील गरिबी कमी करण्यात 'एफडीआय'चे यश महत्त्वाचे आहे.दारिद्र्याच्या प्रमाणात घट झाली. दारिद्र्याचे प्रमाण २००० मधील २२.२ टक्क्यांवरून २०२२ मध्ये १०.२ टक्क्यांपर्यंत घसरले. 'एफडीआय'च्या ओघामुळे रोजगाराच्या संधी खुल्या करणे आणि लोकांना सक्षम करणे या गोष्टी शक्य झाल्या आहेत.तथापि, 'एफडीआय'ने उत्पन्नातील असमानता वाढवण्यास हातभार लावला आहे. जी वर्ष २०००मधील ०.३२ वरून २०२२मध्ये ०.३५ पर्यंत वाढल्याचे दिसते. पायाभूत सुविधांचा अभाव आणि क्लिष्ट कामगार नियमांमुळे 'एफडीआय' आकर्षित करणे कठीण झाले आहे. अलीकडे आपण 'एफडीआय'मध्ये लक्षणीय वाढ का करू शकलो नाही? जर आपण 'एफडीआय'च्या प्रवाहाची चीनशी तुलना केली, तर मुख्यतः संस्थात्मक चौकटीअभावी आपण अजूनही 'एफडीआय'मधील लक्षणीय वाटा आकर्षित करू शकत नाही.आजवर, आपण आपल्या सरकारी कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा करू शकलेलो नाही, हे जागतिक बँकेच्या गव्हर्नन्स इंडिकेटर डेटावरून समजू शकते. कायद्याचा नियम निर्देशांक वर्ष २०००मधील ०.३ वरून २०२२ मध्ये ०.१ वर घसरला. 'कायद्याचा नियम निर्देशांक' लोक सामाजिक नियमांवर किती विश्वास ठेवतात, त्यांचे पालन करतात; विशेषतः पोलिस, न्यायालये, मालमत्ता अधिकार, करार अंमलबजावणी यांच्या विश्वासार्हतेबद्दल इ. त्याचप्रमाणे, आतापर्यंत आपण राजकीय स्थिरता निर्देशांकात लक्षणीय सुधारणा करू शकलेलो नाही.आतापर्यंत आपण राजकीय स्थिरता निर्देशांक सुधारू शकलेलो नाही. मात्र भ्रष्टाचार नियंत्रण निर्देशांकात काहीशी सुधारणा दिसते. सरकारी परिणामकारकता निर्देशांकही वर्ष २०००मधील उणे ०.२वरून २०२३ मध्ये ०.४ पर्यंत सुधारला आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो, की जर आपण आपली संस्थात्मक यंत्रणा सुधारली तरच भारत अधिकाधिक 'एफडीआय' आकर्षित करू शकेल.

# संशोधनाची दशा-दिशा

'मास्टर ऑफ फिलॉसॉफी' म्हणजेच एमफिल ही पदवी मध्यंतरीच्या काळात खूपच जोरात होती. वरिष्ठ महाविद्यालयांत शिक्षक होण्याच्या अर्हतेत तिचा समावेश होता. काही वर्षे खपून संशोधन करून 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' म्हणजेच पीएचडी मिळविणे अवघड वाटत असल्यास किंवा तेवढा कालावधी देता येत नसल्यास संशोधनाची व्याप्ती कमी करून आणि तुलनेने कमी कालावधीत एमफिल मिळविणे सहज शक्य होते. त्यामुळे जागोजागी एमफिल मिळवून देणाऱ्या संस्था सुरू झाल्या होत्या.एमफिलची एक बाजारपेठच जणू विकसित झाली होती. मात्र, महाविद्यालयीन शिक्षकासाठीच्या अर्हततेतून एमफिलला वगळले गेल्यानंतर त्याच्या वाटेने जाणाऱ्यांची संख्या रोडावत गेली. संशोधनाशी संबंधित एक पदवी नावावर हवी असे वाटणाऱ्या हौशी जनांपुरती ती मर्यादित होत गेली. याउलट पीएचडीकडील ओघ वाढत गेला. नवीन शिक्षण धोरणाने तर एमफिलवर फुलीच मारली. त्यानुसार एमफिलसाठीचा अभ्यासक्रम न राबविण्याचा आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) गेल्या वर्षी दिला होता. तरीही काही विद्यापीठांनी चालू शैक्षणिक वर्षात एमफिलला प्रवेश दिले; हे प्रवेश ग्राह्य धरणार नसल्याचे आणि एमफिल आता इतिहासजमा झाल्याचे सांगण्यासाठी 'यूजीसी'ने पुन्हा एकदा सूचना केली आहे. त्यामुळे एमफिलबद्दलची चर्चा पुन्हा ऐरणीवर आली. ज्या विद्यापीठांनी यंदा या अभ्यासक्रमाला प्रवेश दिला आहे, तेथील विद्यार्थ्यांवर याचा परिणाम होईल. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह अनेक विद्यापीठांनी एमफिलला यंदा प्रवेशच दिला नसल्याने तिथे हा प्रश्न उपस्थित होणार नाही. मात्र, या निमित्ताने एकूणच देशातील विद्यापीठांमधील संशोधनाची चर्चा व्हायला हरकत नाही.उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात देशात गेल्या दहा वर्षांत संख्यात्मक प्रगती नक्कीच झाली आहे. २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात देशात उच्च शिक्षण घेणाऱ्यांची एकूण संख्या ४.१४ कोटी होती. त्याच्या आधीच्या दशकाच्या तुलनेत विद्यार्थिसंख्येतील वाढ तब्बल २१ टक्के आहे. उच्च शिक्षण घेण्याच्या वयोगटात असलेल्या मुला-मुलींपैकी महाविद्यालयांत प्रवेश घेणाऱ्यांचे प्रमाण २७.३ टक्के आहे. दरवर्षी पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्यांची संख्या आता एक कोटी झाली आहे. संशोधन करणाऱ्यांच्या संख्येतही लक्षणीय वाढ होत असून, सध्या सुमारे दोन लाख विद्यार्थी पीएचडी करीत आहेत. २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात पीएचडी करणाऱ्यांची संख्या सव्वा लाखाच्या घरात होती. याचा अर्थ पाच-सहा वर्षांत पीएचडी



करणाऱ्यांच्या संख्येत पाऊण लाखाने वाढ झाली आहे. या सर्वांना संशोधनात रस आहे की पीएचडी या पदवीमुळे प्राप्त होणाऱ्या अर्हतेत हा वेगळा संशोधनाचा विषय होऊ शकेल. काही वर्षांपूर्वी एमफिलसाठी जे भरते आले होते, तसेच भरते आता पीएचडीसाठी आले आहे, असे नक्की म्हणता येईल. त्यामुळे एमफिलची जशी बाजारपेठ विकसित झाली होती, तशीच बाजारपेठ पीएचडीबाबत निर्माण होत आहे. अर्हतेमुळे पीएचडीला महत्त्व आल्याने त्याकडील ओघ वाढला; त्यामुळे त्यासाठी होणाऱ्या संशोधनाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. पीएचडीच्या सर्वच प्रबंधांची गुणवत्ता वाईट असते, असे नाही; परंतु वाईट असणाऱ्यांचे प्रमाण किती हे तपासणे आवश्यक ठरते. एमफिलला अवैध ठरवून पीएचडीचा पुरस्कार केला, तरी संशोधनाच्या गुणवत्तेचे असे प्रश्न कायम राहणार आहेत.संशोधनात शोधनिबंधांच्या जोडीने लिहिलेल्या गेलेल्या शोधनिबंधांचा दाखला (सायटेशन) किती जणांनी दिला याला विशेष महत्त्व असते. एका आकडेवारीनुसार, २०१७ ते २०२२ या काळात देशात एकूण तेरा लाख शोधनिबंध प्रकाशित झाले. त्याच्या आधीच्या पाच वर्षांच्या तुलनेत शोधनिबंधांतील ही वाढ ५४ टक्के होती. शोधनिबंधांबाबत भारत चौथ्या स्थानी असून, चीन (४५ लाख), अमेरिका (४४ लाख), ब्रिटन (१४ लाख) हे देश पुढे आहेत. मात्र, 'सायटेशन'च्या बाबतीत भारत नवव्या स्थानी आहे. याचा अर्थ आपल्याकडे लिहिल्या जाणाऱ्या शोधनिबंधांचा दाखला तुलनेने कमी वेळा दिला जातो. पुढील संशोधकांना हे शोधनिबंध संदर्भ म्हणून उपयुक्त ठरणार नसतील, तर त्यांची संख्या अधिक असून काय उपयोग असा प्रश्न यामुळे उपस्थित होतो. विशिष्ट नोकरीसाठी पीएचडीची सक्ती केल्याने खरेखुरे संशोधन कितपत होते हे यातून स्पष्ट होते. एमफिलच्या बाबतीत हेच झाले होते. आता पीएचडीच्या बाबतीतही असेच होणार हे स्पष्ट दिसते. एकूण लोकसंख्येच्या तुलनेत उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे आणि संशोधन करणाऱ्यांचे प्रमाण अजून वाढायला हवे हे खरे; परंतु ते वाढविताना शिक्षणाच्या आणि संशोधनाच्या उपयोजनासाठी पूरक वातावरण निर्माण करणेही गरजेचे आहे. तसे न झाल्यास पदवीधारकांची संख्या केवळ फुगत जाईल; परिस्थिती मात्र कायम राहील.

# जेवणाचा दर्जा आणि व्यवस्था एकदम उत्तम खेळाडू आणि प्रशिक्षकांनी व्यक्त केल्या भावना

## हपालकमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि जिल्हा प्रशासनाच्या नियोजनाचे कौतुक





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या संकल्पनेतून तालुका स्तरावर प्रथमच होणा–या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील नियोजनाने येथे आलेले खेळाडू आणि प्रशिक्षक भारावून गेले आहेत. जिल्ह्यात आगमन होताच खेळाडूंच्या स्वागतापासून तर जेवण आणि निवासाच्या व्यवस्थेबद्दल त्यांनी पालकमंत्री श्री. मुनगंटीवार आणि जिल्हा प्रशासनाचे आभार मानले आहे. विशेष म्हणजे येथे असलेला जेवणाचा दर्जा आणि व्यवस्था एकदम उत्तम असल्याच्या भावना खेळाडू आणि प्रशिक्षकांनी व्यक्त केल्या आहेत.

२७ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत बल्लारपूर (विसापूर) तालुका क्रीडा संकूल येथे ६७ व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी देशभरातून जवळपास १६०० खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक, मार्गदर्शक आदी चंद्रपूर जिल्ह्यात दाखल झाले आहेत. जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी बाहेरून येणारे खेळाडू, प्रशिक्षक व सर्वांची निवास, भोजन, वाहतूक आदी व्यवस्था अतिशय दर्जेदार करण्याच्या सुचना जिल्हा प्रशासनला दिल्या होत्या. याबाबत त्यांनी वारंवार पाठपुरावा व बैठका घेऊन अतिशय सुक्ष्म नियोजन करून घेतले. त्याचीच फलश्रुती म्हणून येथे आलेल्या खेळाडूंनी व्यवस्थेबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

यावेळी हरयाणा येथून थलेटिक्स शॉर्ट पुल स्पर्धेत सहभागी होणारी तमन्ना म्हणाली, येथे राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था अतिशय उत्तम करण्यात आली आहे. येथे येऊन खुप छान वाटत आहे. खेळाडूंसाठी प्रशासनाने सर्वच व्यवस्था दर्जेदार केल्या आहे. तर तमन्नाचे प्रशिक्षक म्हणाले, खेळाडूंना जेवण वेळेवर विशेष म्हणजे ग्राऊंडजवळ मिळत आहे, ही वाखाणण्याजोगी बाब आहे.

अशी आहे भोजन व्यवस्था :

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेदरम्यान विसापूर तालुका क्रीडा संकूल येथे रोज २५०० ते ३००० जणांसाठी सकाळचा नास्ता, दुपारचे जेवण, सांयकाळी चहा–कॉफी आणि रात्रीच्या जेवणाची व्यवस्था करण्यात येत आहे. सकाळी ७.३० ते १०.३० या वेळेत खेळाडू, प्रशिक्षकांना नास्ता दिला जातो. यात दिवसनिहाय मिसळ पाव, उपमा, पोहे, साबुदाणा खिचडी, वडासांबार, फळे, ब्रेड बटर, टी–कॉपी यांचा समावेश असतो. दुपारचे जेवण १२.३० ते ३.३० यावेळेत दिले जाते. याय दोन भाज्या (मिक्स व्हेज, वांगे, आलूमटर, सोयाबीन मटर व इतर भाज्यांपैकी कोणत्याही दोन) कडी, वरण, मसाला भात, पोळ्या, लोणचे, पापड, ग्रीन सलाद, चटणी आणि एक स्वीट यांचा समावेश असतो. तर रात्रीच्या जेवणात एक व्हेज भाजी व इतर पदार्थ दुपारच्या जेवणाप्रमाणेच असून रोज नॉन–व्हेज तयार करण्यात येते. तसेच कधी रबडी, व्हेजपुलाव, हलवा, आईसस्क्रीम आणि दूध देखील देण्यात येत आहे. भोजनाची संपूर्ण व्यवस्था बघण्यासाठी २५० ते ३०० जणांची टीम कार्यरत आहे.

## हिंगणघाट विधानसभा क्षेत्रातील समुद्रपूर तालुक्यातील विविध गावातील कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

### आ.समिर कुणावार यांचे प्रमुख उपस्थितीत पक्ष प्रवेश सोहळ्याचे आयोजन



**वर्धा । प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक तसेच युवा कार्यकर्ते आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत. दि. ३० रोजी हिंगणघाट, समुद्रपुर, सिंदी रेल्वे विधानसभा क्षेत्रातील समुद्रपूर तालुका मधील समुद्रपूर, वडगाव (सावंगी) व परडा येथील बहुसंख्य कार्यकर्त्यांनी आ. समीर कुणावार यांचा विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास तसेच कार्यसम्राट आमदार यांची कार्यशैली पहाता मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश केला.

सदर प्रवेश सोहळा दि. ३० रोजी आ. समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात प्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रामुख्याने गिरधर लढी, नरेश लढी,, लंकेश राऊत, कृणाल मुडे ,गौरव लढी, वैभव लढी, गजानन रोकडे ऋषिकेश रोकडे, गणेश लढी, प्रमोद बटाले, मंगेश खंडाळकर, आदित्य मडावी, कृणाल भगत, लहू खंडाळकर , प्रदीप रोहनकर, गजानन झाडे, नरेंद्र नांदुरकर, धनंजय महाकालकर, निलेश मुंगले, भूपेंद्र नांदूरकर, कवडू वैद्य, देवा पाल, दादाराव नांदुरकर, बापूराव पाल, नथुजी फुकट, हरी विठ्ठल बारई , नंदकिशोर चंदनखेडे, गोपाल फुकट , बिबीशन तडस, मारुती चौधरी, विठ्ठल चंदनखेडे ,सुनील रोहनकर, संजय नांदुरकर, विभीशण महाजन इत्यादी कार्यकर्त्यांना रितसर भाजपात प्रवेश देण्यात आला.

उपरोक्त कार्यक्रम आमदार समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.उपरोक्त कार्यक्रमाचे वेळी कार्यसम्राट आ.समीर कुणावार यांचेसह भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अंकुश ठाकूर, भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश महामंत्री रवी उपासे, भारतीय जनता पार्टी विधान सभा प्रमूख संजय डेहणे, भाजपा जिल्हा महामंत्री आकाश पोहाणे, हिंगणघाट तालुका भाजपा अध्यक्ष विनोद विटाळे, समुद्रपूर भाजपा तालुका अध्यक्ष वामन चंदनखेडे, समुद्रपूर माजी नगराध्यक्ष गजानन राऊत, शंकरराव मुंजेवार ,रवींद्र लढी, प्रल्हाद नांदुरकर ,नारायणराव बादले ,राजू माडेवार, अंकुश खुरपडे सरपंच ,कैलास टिपले, रमेश मडावी सरपंच, शेषराव तुळनकर, इत्यादी भाजपा पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते सदर कार्यक्रमाला उपस्थित होते.

## आंतरशालेय क्रिडा स्पर्धेत सेंट जॉनचा दणदणीत विजय

**पुलगाव । प्रतिनिधी**



स्थानिक यशबोध ज्ञान द्वारा संचालित सेंट जॉन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथील विद्यार्थानी आंतरशालेय क्रिडा स्पर्धेत भरघोस यश संपादन केले.ज्ञानभारती हायस्कूल व कनिष्ट महाविद्यालय पुलगाव यांच्या संयुक्त विदयमानाने आयोजित करण्यात आलेल्या आंतरशालेय क्रिडा स्पर्धेत प्राथमिक गटात– १०० मीटर धावण्यात सेंट जॉनच्या आयुष राऊत ने प्रथम क्रमांक प्राप्त केला, तर उच्च प्राथमिक गटात–कबड्डी खेळात मुलीचा संघ विजयी झाला.त्यात सोनम बघेल, माही ढोले, जानवी काळे, स्वरा शर्मा, अवनी जळीत, तन्वी घोटेकर, नेहा साकसावळे, ज्ञानेश्वरी कोंबे, अवंती राऊत, नंदिनी कोसळकर यांचा समावेश आहे. यशस्वी विद्यार्थांचे शाळेचे प्रेसिडेंट प्रिती बोरसे , प्राचार्य संतोष यादव , व्हाईस प्रिंसिपल आरती कुरझडकर , व्हाईस प्रिंसिपल महेंद्र भोयर आणि सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आणि त्यांच्या भविष्यातील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. त्यांचे मार्गदर्शक सत्यम कोथलकर आणि वैभव शिरभाते यांचे सुद्धा सर्वांनी अभिनंदन केले.

## रामदास नागपुरे यांचे वृद्धपकाळाने निधन



भद्रावती :स्थानिक झिंगुजी वार्ड येथील निवासी तथा अखिल चंद्रपुर जिल्हा भोई समाज सेवा संघाचे जिल्हा अध्यक्ष कृष्णाजी नागपुरे यांचे बंधू रामदास घुलारामजी नागपुरे यांचे पहाटे ३:१५ ला वृद्धपकाळाने निधन झाले.मृत्युसमयी ते ८० वर्षाचे होते.त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा,२ मुली व बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्यावर स्थानिक मल्हारा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार पार पडला.

## पुढील ४८ तासांत राज्यात पावसाची शक्यता

**पुणे**–मागील २ दिवसांपासून राज्यातील तापमानात वाढ झाली आहे. राज्यातील अनेक भागात तापमानाचा पारा १० अंशांच्या पुढे गेला आहे. मात्र सरत्या वर्षाला निरोप देताना थर्टी फर्स्टला राज्यात पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. देशासह राज्यातील काही भागात तुरळक ठिकाणी पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे.दरम्यान, येत्या काही दिवसात राज्यातील हवामानात चढ–उतार पाहायला मिळणार आहे. राज्यातील तापमानात घट होण्याची शक्यता असून काही भागात पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोलाच्या माजी विद्यार्थ्यांचे एमपीएससी परीक्षेमध्ये घवघवीत यश

## प्रशासकीय सेवा करत असताना डॉ.गणपतराव देशमुख यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवावा–प्राचार्य हेमंत आदलिंगे

**सांगोला । प्रतिनिधी**




न्यू इंग्लिश स्कूल व जुनिअर कॉलेज सांगोला च्या माजी विद्यार्थ्यांनी नुकत्याच झालेल्या एमपीएससी परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये वैभव पांडुरंग खराडे महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेमध्ये प्रथम येऊन पशुधन विकास अधिकारी म्हणून त्याची निवड झाली आहे . विनायक भागवत सोनलकर हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यातून चौथा व एन टी प्रवर्गातून राज्यात प्रथम क्रमांकाने येऊन दुय्यम निबंधक या पदासाठी निवड झाली आहे तर अक्षय मच्छिंद्र वाघमोडे याने परीक्षेत राज्यात १३ वा व एन टी प्रवर्गातून प्रथम क्रमांकाने येऊन सहाय्यक कक्ष अधिकारी या पदासाठी निवड झाली आहे. इयत्ता बारावी शास्त्र मधील अंकिता खंडागळे ही विभागीय किक बॉक्सिंग स्पर्धेत प्रथम क्रमांकाने येऊन सुवर्णपदकाची मानकरी ठरली आहे. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात कार्यक्रमाचे आयोजन न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मध्ये करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला चे प्राचार्य हेमंत आदलिंगे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सदस्य प्राध्यापक डॉ. अशोक शिंदे हे होते. प्रारंभी सर्व गुणवंतांचा सत्कार समारंभ कॉलेजचे प्राचार्य हेमंत अदलिंगे सर, उपप्राचार्य केशव माने सर, पर्यवेक्षक संजय शिंगाडे सर यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी संस्था सदस्य प्राध्यापक डॉ. अशोक शिंदे प्रा. दीपक खटकाळे प्रा. जयंत जानकर कार्यक्रम आयोजन समितीचे प्रमुख प्रा. चंद्रकांत इंगळे सर न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज सांगोला मधील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये बोलत असताना प्राचार्य हेमंत आदलिंगे सर यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शनपर सल्ला देत असताना असे सांगितले की, तुम्ही सर्वांनी सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते डॉ. गणपतराव देशमुख यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपल्या प्रशासकीय सेवा उत्तम रीतीने पार पाडून ओळख निर्माण करावी. डॉ. गणपतराव देशमुख यांनी आपले संपूर्ण आयुष्य गोरगरीब,शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी चंदनासारखे झिजवले . त्यांचे जीवन हाच संदेश.. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही, असे सांगून त्यांना पुढील प्रशासकीय सेवेसाठी शुभेच्छा दिल्या. उपस्थित ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे सांगितले की, तुम्ही सुद्धा तुमचे ध्येय आत्ताच निश्चित करा व ध्येय सिद्धी करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करा. यासाठी या ज्युनियर कॉलेजमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले. याचा मूळ उद्देश आत्ताच विद्यार्थ्यांनी आपले ध्येय ठरवून त्या दिशेने प्रामाणिक प्रयत्न करावेत हा आहे. यासाठी या ज्युनिअर कॉलेजमधील प्रत्येक घटक तुमच्यासाठी सदैव प्रयत्नशील असतो असे सांगितले.आपल्या मनोगतामध्ये बोलत असताना संस्था सदस्य प्राध्यापक डॉ. अशोक शिंदे हे असे म्हणाले की, मागील पाच वर्षापासून आपण या न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू केले आहे. याचा निश्चितच फायदा येथील विद्यार्थ्यांना होत आहे. याशिवाय शास्त्र विभागामध्ये ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी टॉपर बॅच व क्रॅश कोर्स चे आयोजन केले जाते असे सांगितले व गुणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी पशुधन विकास अधिकारी वैभव पांडुरंग खराडे, दुय्यम निबंधक विनायक भागवत सोनलकर, सहाय्यक कक्ष अधिकारी अक्षय मच्छिंद्र वाघमोडे यांनी आपल्या मनोगतामध्ये या न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला शाळेविषयी व सर्व मार्गदर्शक शिक्षकांविषयी गौरवोद्गार काढले. तसेच सध्या सुरू असलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये मार्गदर्शन करण्यासाठी आम्ही निश्चित येऊ असे आश्वासन दिले व आम्ही आबासाहेबांच्या विचारांचा वारसा जतन करू असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष राजगुरू तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. मिलिंद पवार यांनी मानले.

# बीडमध्ये शालेय राष्ट्रीय रग्बी स्पर्धेत यशस्वी खेळाडूंचा मोरया क्रीडा मंडळाकडून सत्कार

## खेळाडूंमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर बीड जिल्ह्याचा नावलौकिक–डॉ.योगेश क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळाडू जात आहेत आता रबग्बी खेळाकडे खेळाडू आकर्षित झाले आहेत. या खेळातील खेळाडूंमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर बीड जिल्ह्याचा नावलौकिक वाढत आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी केले, ते शहरातील गर्गे स्मारक परिसरातील क्रीडा मैदानावर शालेय राष्ट्रीय रम्बी स्पर्धेत यशस्वी खेळाडूंचा मोरया क्रीडा मंडळ व बीड रग्बी असोसिएशनच्यावतीने गुरुवारी (दि.२८) सत्कार सोहळा पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून

डॉ. योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर नगरसेवक रणजित बनसोडे, विठ्ठल गुजर, बीड रोटरी क्लबचे अध्यक्ष गणेश मैड, कृष्णा काकडे, बीड जिल्हा रग्बी असोसिएशनचे अध्यक्ष ईसाक शेख, सुरज मस्के,अमोल पवार,सतीश उबाळे,मच्छिन्द्र मस्के, प्रफुल्ल हटवटे, असद चाऊस, सतीश उबाळे, विठ्ठल गुजर, दिपक गिराम, खो–खो असोसिएशनचे कोषाध्यक्ष योगेश सोळसे आदींची उपस्थिती होती,

पुढे बोलताना डॉ. योगेश क्षीरसागर म्हणाले,रग्बी खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक ते पाठबळ दिले जाईल,खेळाडूंनी रग्बी खेळातून करिअर घडवावे.तब्बल १० वर्षानंतर महाराष्ट्र संघाने रग्बी स्पर्धेत यश मिळविले. यामध्ये २ खेळाडू च महाराष्ट्र संघाचे प्रशिक्षक देखील बीड जिल्ह्यातीलच होते, याचा अभिमान वाटतो, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. रणजित बनसोडे, गणेश मैड यांनी मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचलन सतीश उबाळे यांनी केले. आभार नितीन वेळवे यांनी मानले. यावेळी क्रीडा मंडळाचे सदस्य, पालक व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### राष्ट्रीय स्पर्धेसाठी ७ खेळाडूंची निवड

पुण्यात होणाऱ्या रम्बी स्पर्धेसाठी १९ वर्ष वियोगटातील ४, १७ वर्ष वयोगटातील २ मुले व १ मुलगी अशा ७ खेळाडूंची निवड झाली आहे. यामध्ये खेळाडू यश जाधव, सूरज येवले, ओमकार मोरे, ईश्वर कानडे, वेदांत डावकर, ऋषभ शिंदे, जिल्ह्यातील पहिली राष्ट्रीय खेळाडू आदिती लोढ या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

### प्रशिक्षक, खेळाडूंचा सत्कार

भारत सरकारच्या क्रीडा विभागाने ओडिशा राज्यातील भुवनेश्वर येथे आयोजित केलेल्या शालेय राष्ट्रीय रग्बी स्पर्धेत महाराष्ट्र संघाने यश संपादन करत कांस्य पदक पटकावले, त्याबद्दल प्रशिक्षक नितीन येळवे, खेळाडू आर्यन येळवे, प्रेम मस्के यांचा सत्कार करण्यात आला.

# बँकॉक येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेकरीता वरोरा येथील ८ योगपटूंची निवड



श्रीकांत घाणवडे | सई नेवास्कर | शौनक आमटे | गायत्री पाल | राम झाडे | साहिल खापणे | साहल खापणे | शर्वरी मिटकर

**वरोरा । प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या ३५ व्या राष्ट्रीय योगासन स्पर्धे मध्ये वरोरा येथील एस ए . योगा इन्स्टिटयुट च्या योगपटुंची बँकॉक (थायलंड) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धे करीता निवड झाली असून ही स्पर्धा येत्या मार्च २०२४ ला होणार आहे.

ही स्पर्धा विविध योग प्रकार जसे पारंपरिक योगा, रिदमीक योगा, आर्टिस्टिक योगा या तीन विभागांमध्ये घेन्यात आली होती त्यामध्ये शौनक आमटे १ सुवर्ण पदक ,राम झाडे २ सुवर्ण पदक ,साहिल खापणे १ कांस्य पदक,श्रीकांत घानवडे उपविजेता ,स्वर्णिका नौकरकर २ सुवर्ण पदक ,सई नेवास्कर–१ सुवर्ण पदक, गायत्री पाल – १ रौप्य पदक शर्वरी मिटकर– उपविजेती(४ क्रमांक ) तसेच महाराष्ट्र संघाने जास्तीत जास्त पदके मिळवून उच्चांक प्राप्त केला आहे. एस ए . योगा इन्स्टिटयुट चे प्रशिक्षक तथा संस्थापक स्वप्नील पोहनकर, अनिकेत ठक यांच्या मार्गदर्शनाखाली विजेते सर्व योग पटू नियमित सरावाचे धडे घेत आहेत.तसेच सर्व योगपटुंना तालुका क्रीडा संकुल तथा सर्व पालकांचे सहकार्य लाभले. त्यांच्या या विजयाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे .



# जिल्हाधिकाऱ्यांकडून मतदान केंद्रांवरील सुविधांची पाहणी

## चंद्रपूर व मूल तालुक्यातील मतदान केंद्रांना भेट



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी आज ३० डिसेंबरला चंद्रपूर व मूल तालुक्यातील मतदान केंद्रांना भेट देवून मतदार नोंदणी प्रक्रीयेचा आढावा घेतला.जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी चंद्रपूर विधानसभा मतदार क्षेत्रातील मतदान केंद्र क्रमांक १२९ व १३१ तसेच मूल येथील मतदान केंद्र क्रमांक १०२ व १०३ येथील मतदान केंद्रावरील सुविधांचे निरिक्षण करून आवश्यक किमान सुविधा उपलब्ध करण्याचे व या कामात येणाऱ्या अडचणींबाबत अहवाल देण्याचे सांगितले. याप्रसंगी त्यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी संवाद साधून मतदाराचे छायाचित्र व नावांची अचूक नोंदणी होत आहे का याबाबत भौतिक पडताळणी करून खात्री करण्याच्या सूचना दिल्या व पात्र व्यक्ती मतदार नोंदीपासून वंचित राहू नये व मतदार यादी अचूक करण्याचे निर्देश त्यांनी दिले.जिल्हाधिकारी विनय गौडा यांचेसोबत, सहायक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., तहसीलदार विजय पवार नायब तहसीलदार किशोर साळवे, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व पर्यवेक्षक उपस्थित होते.

# राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी अपघात ग्रस्ताला उपचाराकरिता केली अर्थिक मदत

**अहेरी । प्रतिनिधी**

आलापल्ली येथील रहिवासी असलेला खाजगी वाहन चालक संदीप गाडगे हा नेहमी प्रमाणे आपल्या गाडीने चंद्रपुर येथून भाजीपाला गाडीत भरून परत आलापल्ली येथे येत असताना मूलचेरा गावाजवळ वाहन पलटी झाल्याने वाहन चालक संदीप गाडगे गंभीर जखमी झाले आणि यात त्यांच्या हाताला तीन ठिकाणी फॅक्चर झाले आहे. त्यांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे पण उपचारासाठी खर्च कसा करायचा ? हा प्रश्न आणि घरची परिस्थिती अत्यंत गरीबीची असल्याने त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार घेण्यासाठी आर्थिक अडचण निर्माण झाली.ही माहिती होताच माजी राज्यमंत्री तथा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी तात्काळ वाहन चालक संदीप गाडगे यांच्या कुटूंबालातील



सदस्य यांना बोलावून त्यांच्या उपचारासाठी १०,०००(दहा हजार रुपये) आर्थिक मदत केली.आपण पुन्हा सर्वतोपरी सहकार्य करणार असे आश्वासन खाजगी वाहन चालक संदीप गाडगे यांच्या कुटूंबाला दिले.माजी राज्यमंत्री तथा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम हे आपल्या अहेरी विधानसभा क्षेत्रातील कॅन्सर ग्रस्त,अपघात ग्रस्त,आणि आर्थिक अडचणीत असल्याने प्रत्येक व्यक्तीला मदत करत असतात.त्यांनी आतापर्यंत अनेकांना आर्थिक मदत केली आहे.यावेळी वाहन चालक संदीप गाडगे यांचे कुटुंबातील सदस्य व मित्र मंडळ उपस्थित होते..

# राष्ट्रवादी ओबीसी सेल प्रदेश उपाध्यक्षपदी चंद्रशेखर शाहू

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते चंद्रशेखर गोविंदलाल शाहू यांचे महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी ओबीसी सेल च्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रदेश राष्ट्रवादी ओबीसी सेल अध्यक्ष कल्याण आखाडे, पुर्व केंद्रीय मंत्री सुबोध मोहिते पाटील, समन्वयक ईश्वर बाळबुदे, जिल्हा अध्यक्ष शरद सहारे यांच्या आग्रहानुसार नियुक्ती करण्यात आली.चंद्रशेखर साहू यांच्या नियुक्ती बद्दल तुषार वाघ, सिद्धार्थ फुसाटे, युसुफ खान, शैलेश साहू, सुरज ठाकूर, राजेश सावरकर, अनुप भार्गव, घनश्याम दंतलवार, दुर्गेश बरडे, अमित ददगाल, जितेंद्र श्रीवास्तव, निरज तिवारी, रितेश भगत यांनी अभिनंदन केले आहे.



# विद्यार्थ्यांच्या हिताकरीता वनविभाग सर्वोच्च न्यायालयात जाणार–हवनमंत्री सुधीर मुनगंटीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

पेसा कायद्यांतर्गत येणाऱ्या गावातील वनरक्षक पदे सोडून इतर पदे तात्काळ भरण्यासाठी राज्याचा वन विभाग राज्य सरकारमार्फत सर्वोच्च न्यायालयाला विनंती करणार आहे. हजारो विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांना दिलासा मिळावा या दृष्टीने वनमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी हा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे.महाराष्ट्र राज्य वन विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीनंतर वनमंत्री ना .मुनगंटीवार यांनी वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर यांच्याशी चर्चा करून सदर भरती प्रक्रियेचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांच्या हिताकरीता राज्य सरकार, वन विभाग आणि मी स्वतः संवेदनशील असून त्यांना दिलासा मिळावा, असा आमचा उद्देश आहे. त्यामुळे या विद्यार्थांचे हित प्राधान्यक्रमावर आहे, म्हणूनच हा निर्णय घेत असल्याचे ना .मुनगंटीवार म्हणाले. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयात विशेष वकील नियुक्त करण्याची कार्यवाही करा, असे निर्देशही त्यांनी दिले.हजारो उमेदवारांनी वनरक्षक या पदाची परिक्षा दिली असून केवळ पेसा क्षेत्राच्या अधिसुचनेसंदर्भात संपूर्ण निकाल जाहीर न होऊ शकल्याने अनेक उमेदवार निकालाची वाट बघत आहेत. ही बाब वनमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी हा विषय गांभिर्याने घेऊन वनविभागाला सुचना केल्या. पेसा क्षेत्र वगळता वनरक्षकाची इतर पदे भरण्यासाठी वन विभाग राज्य सरकारमार्फत सर्वोच्च न्यालयालयाला याबाबत विनंती करणार आहे.



यासाठी विशेष वकील नेमण्यात येईल. जेणेकरून इतर क्षेत्रातील वनरक्षक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांच्या नोकरीचा मार्ग सुकर होईल.वन विभागातील लघुलेखक (उच्चश्रेणी )(गट ब) (अराजपत्रित), लघुलेखक (निम्मश्रेणी )(गट ब) (अराजपत्रित), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) गट ब) (अराजपत्रित), वरिष्ठ सांख्यिकी सहायक (गट क) कनिष्ठ सांख्यिकी सहायक (गट क) या राज्यस्तरीय संवर्गाची व लेखापाल (गट क), सर्व्हेक्षक (गट क) व वनरक्षक (गट क) या पदांच्या भरतीसाठी दिनांक ८ जून २०२३ रोजी जाहिरात देण्यात आली होती. वरील जाहिरातीच्या अनुषंगाने संपूर्ण राज्यभरात ५.५ लक्ष अर्ज प्राप्त झाले. वनविभागाची भरती प्रक्रिया ही टी.सी.एस.आय.ओ.एन या कंपनीमार्फत राबविण्यात आली असून त्यांच्याकडून उमेदवारांची ऑनलाईन लेखी परीक्षा ही राज्याच्या विविध १२९ केंद्रावर दि. ३१ जुलै ते ११ ऑगस्ट २०२३ या कालावधीत घेण्यात आली. यापरिक्षेकरीता ८६.४९ टक्के उमेदवार उपस्थित होते.भरती प्रक्रियेचे पुढील टप्पे जसे न्सर की देणे व त्यावर आक्षेप मागविणे, आक्षेपांचे निवारण करणे, अंतिम न्सर की देणे ही कार्यवाही पूर्ण करण्यात आली. तसेच वनरक्षक वगळता ऑनलाईन परिक्षेचा निकाल २२ नोव्हेंबर २०२३ रोजी जाहीर करण्यात आला. मात्र राज्यपाल यांच्या २९ ऑगस्ट २०१९ अन्वये पेसा क्षेत्रातील पदे स्थानिक अनुसूचित जमातीसाठी अधिसुचित करण्यात आली आहे. या अधिसुचनेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असून या प्रकरणी पुढील कार्यवाही न करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या सुचना आहेत. त्यामुळे वनरक्षक पदाचा निकाल जाहीर करण्यात आला नाही.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .